# Washim District Police

**Nature of Work** :- **Raid on Gutakha**

**Police Station** :- **Local Crime Branch**

**Date of Good Work done** :- **07/10/2020**

**Brief of the work done :-**

पो.स्टे. जऊळका हद्दीत स्थानिक गुन्हे शाखा, वाशीम यांच्या कारवाईमध्ये कोट्यवधी रुपयांचा अवैध गुटखा पकडला. दि. ०८/१०/२०२०

## अबब...एक कोटींच्यावर गुटखा जप्त

**सकाळ वृत्तसेवा**

जऊळका रेल्वे, ता. ७ : पोलिसांना मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे औरंगाबाद-नागपूर द्रुतगती मार्गावरील 'काळमाथा' जवळ केलेल्या कारवाईत तब्बल एक कोटींचा गुटखा तसेच मुद्देमाल जप्त करण्यात आला. यावेळी दोन जणांना ताब्यात घेण्यात आले आहे.

जिल्हा पोलिस अधीक्षक वसंत परदेशी, अप्पर पोलिस अधीक्षक विजय चव्हाण यांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक शिवाजी ठाकरे यांनी ही कारवाई केली. पोलिस स्टेशन जऊळकाच्या हद्दीत औरंगाबाद-नागपूर द्रुतगती मार्गावरून गुटख्याची वाहतूक होणार असल्याची माहिती त्यांना मिळाली होती. त्या पार्श्वभूमिवर मंगळवारी (ता.६) रात्री नाकाबंदी करण्यात आली. दरम्यान द्रुतगती महार्गावरील काळमाथा जवळ कंटेनर क्रमांक यु.पी.२१ सी.एन. २१२१ या



**जऊळका रेल्वे : जप्त करण्यात आलेला गुटखा, कंटेनर, अटक केलेले आरोपी व कारवाई करणारे पोलिस अधिकारी कर्मचारी.**

वाहनास थांबवून तपासणी केली असता, त्यामध्ये विमल व व्ही-१ हा तब्बल ९३ लाख ६० हजार रुपयांचा गुटखा व २५ लाख रूपयाचा कंटेनर, असा एकूण एक कोटी १८ लाख ६० हजार रुपयांचा मुद्देमालासह दोन आरोपींना पोलिसांनी ताब्यात घेतले. अन्न व ओषध प्रशासनाने दिलेल्या तक्रारीवरून जऊळका पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास स्थानिक गुन्हे शाखेचे अधिकारी व कर्मचारी करत आहेत.